# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

**विषय :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी-मार्च २०१९ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

# प्र क ट न

---

फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | गुरुवार दि. २१ फेब्रुवारी २०१९ ते बुधवार दि. २० मार्च २०१९ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (पुनर्रचित व जुना अभ्यासक्रम) | शुक्रवार दि. ०१ मार्च २०१९ ते शुक्रवार दि. २२ मार्च २०१९ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर **दिनांक ०५/१०/२०१८ पासून** उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०१९ च्या लेखी परीक्षेचे **संभाव्य वेळापत्रक** जाहीर करण्यात आलेले आहे.

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इ.१०वीकरिता पुनर्रचित अभ्यासक्रम असल्याने पुनर्परीक्षार्थ्यांकरिता अंतिम संधी असलेले जुन्या अभ्यासक्रमाचे स्वतंत्र वेळापत्रक तयार करण्यात आलेले आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**मंडळाच्या संकेतस्थळावरील संभाव्य वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअ‍ॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.**

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**वेळापत्रकाबाबत काही सूचना, हरकती असल्यास त्या विभागीय मंडळाकडे तसेच राज्य मंडळाकडे १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात पाठवाव्यात.**

दिनांक : ०५/१०/२०१८

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४